केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आदिवासी उपयोजनेकरीता SNA SPARSH प्रणालीद्वारे केंद्र हिस्सा ६०% लेखाशिर्ष २२१०F७३८, व राज्य हिस्सा ४०% लेखाशिर्ष २२१०E४५५, मधून सन २०२६-२७ च्या मूळ अर्थसंकल्पिय तरतूदीतून निधी वितरीत करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः बियुडी -१३२६/प्र.क्र.१८७/एनएचएम सं.क्र. १६४०३०३
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : २३ जूलै, २०२६

वाचा :-

१) केंद्र शासनाचे मंजूरी आदेश क्रं.G.२७०१७/२१/२०२६-२७/NHM-F/(E-८३९९५६, दिनांक ०७.०७.२०२६
२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पुरक-२०२६/ प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६
३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/ प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६
४) संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे पत्र क्र.राआसोम/एफएमजी/कें. रा. हि/८७१९५-१०१/२०२६-२७ दिनांक ०९.०७.२०२६.

प्रस्तावना :-

ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल, २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले आहे. सदर योजनेअंतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम (Reproductive child Health), नियमित लसीकरण, मिशन प्लेक्सीपुल, पायाभूत सुविधांचे बळकटीकरण व पल्स पोलिओ लसीकरण इत्यादी आरोग्य सेवा देण्यात येतात. सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने आरोग्य विषयक सर्व केंद्र पुरस्कृत योजना एकत्रित करुन त्यास "राष्ट्रीय आरोग्य अभियान" असे नाव दिले. या राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आता राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रम या केंद्र पुरस्कृत योजनांचा समावेश केला आहे. केंद्र शासनाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी वाचा क्रं.(१) येथील SNA SPARSH प्रणालीद्वारे 2nd Mother Sanction स्वरुपात रु.३४१६७.०० लक्ष अनुदान मंजूर केले आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी केंद्र व राज्य

शासनाचा प्राप्त झालेला निधी सन २०२६-२७ च्या मुळ अर्थसंकल्पीत तरतुदीतून वितरीत केलेला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना करीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी आदिवासी उपयोजनेकरीता (TSP) उपलब्ध करुन दिलेल्या केंद्र हिस्सा ६० टक्के २२१०F७३८ या लेखाशिर्षातंर्गत बाब ३१ सहाय्यक अनुदान वेतनेत्तर अंतर्गत रु.२३०८.०० लक्ष व बाब ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान रु.२०१.०० लक्ष तसेच ४०% राज्य हिस्सा वितरीत करण्याकरिता २२१०E४५५ या लेखाशिर्षाखाली बाब ३१ सहाय्यक अनुदान वेतनेत्तर अंतर्गत रु.१५३८.६७ लक्ष व बाब ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान अंतर्गत रु.१३४.०० लक्ष इतका निधी सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीतुन राज्य आरोग्य सोसायटीस उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य आदिवासी उपयोजनेकरीता (TSP) सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्र हिस्सा ६० टक्के २२१०F७३८ या लेखाशिर्षातंर्गत बाब ३१ सहाय्यक अनुदान वेतनेत्तर अंतर्गत रु.२३०८.०० लक्ष व बाब ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान रु.२०१.०० लक्ष तसेच ४०% राज्य हिस्सा वितरीत करण्याकरिता २२१०E४५५ या लेखाशिर्षाखाली बाब ३१ सहाय्यक अनुदान वेतनेत्तर अंतर्गत रु.१५३८.६७ लक्ष व बाब ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान अंतर्गत रु.१३४.०० लक्ष इतके केंद्र तसेच राज्य हिश्श्याचे अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदरचा खर्च केंद्र लेखाशिर्ष २२१०F७३८ व राज्य लेखाशिर्ष २२१०E४५५ अंतर्गत सन २०२६-२७ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्या लेखाशिर्षाखाली खर्ची दाखविण्यात यावा.

०३. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करुन विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटीच्या यांच्याकडे सूपुर्द करावी. यासाठी सहसंचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४. सदर प्रस्तावावरील खर्च खालील प्रमाणे नमुद लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२६-२७ साठी मंजुर करण्यात आलेल्या उपलब्ध तरतुदीतुन भागविण्यात यावा.

(रु.लाखात)

अ. क्र	तपशिल	केंद्र/राज्य हिस्सा		
		लेखाशिर्ष	सन २०२६-२७ (मूळ तरतूद)	वितरीत करावयाची रक्कम
१	आदिवासी विकास विभाग मांगणी.क्र टी-५, २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०३, ग्रामीण आरोग्य सेवा-विषमचिकित्सा, ७९६,अनुसूचित जमातींसाठी विकास कृती योजना (०१) जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१)(०४) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (केंद्र हिस्सा ६० टक्के) (कार्यक्रम), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२२१०F७३८-३१	२३२२०.१५	२३०८.००
	३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान	२२१०F७३८-३५	२५८०.०२	२०१.००
२	आदिवासी विकास विभाग मांगणी.क्र टी-५, २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६, सार्वजनिक आरोग्य, ७९६ ,अनुसूचित जमातींसाठी विकास कृती योजना (०१) जनजाति क्षेत्र उपयोजना, (०१)(१६) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान-राज्य आरोग्य संस्थांना सहायक अनुदान (राज्य हिस्सा ४० टक्के) (कार्यक्रम), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२२१०E४५५-३१	१५४८०.१०	१५३८.६७
	३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान	२२१०E४५५-३५	१७२०.०१	१३४.००

०५. वित्त विभागाच्या दिनांक ०९ एप्रिल, २०२६ च्या शासन परिपत्रका सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनु.क्र.९ मधील मुद्दा क्र.१ ते ९ मधील अटी व शर्तींची पूर्तता केली असल्याचे कार्यक्रम प्रमुख / संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी शासनास कळविले असून त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ व दिनांक ०७.०५.२०२६ च्या शासन परिपत्रकाच्या परिशिष्ठातील मुद्दा क्र. १ ते ९ मधील अटींची पूर्तता झाली असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

०६. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखा परिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप नसल्याचे राज्य आरोग्य सोसायटीने प्रमाणित केलेले आहे.

०७. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या/लाभार्थ्याच्या खात्यात थेट जमा होणार आहे.

सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात आरोग्य संबंधित औषधे/वस्तू आणि साहित्य हे सन २०२३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ अंतर्गत दिनांक १७-०३-२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिनियमास अनुसरून महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू व सेवा खरेदी प्राधिकरणा मार्फत खरेदी करावयाची असल्याने योजनेचा निधी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू व सेवा खरेदी प्राधिकरणच्या बँक खात्यामध्ये वळते करून आरोग्य संबंधित औषधे/वस्तू आणि साहित्य खरेदी करण्यात येईल.

०८ सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी भारतीय रिझर्व्ह बँक द्वारे खर्च करण्यात येतो. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन परिपत्रकातील संबंधित असलेल्या सर्व तरतुदीचे/अटी व शर्तीचे पालन करुन त्यासंदर्भात आवश्यक ते प्रमाणपत्र सादर करणे अथवा आवश्यक त्या बाबी स्वतंत्रपणे प्रमाणित करणे तसेच सदरहू निधी राज्य आरोग्य सोसायटी किंवा ज्या यंत्रणेमार्फत खर्च करण्यात येणार त्या कार्यक्रम प्रमुखास बंधनकारक राहील.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. मुंविनि-२०२२/प्र.क्र.२७/२०२२/विनियम, दिनांक १२.०१.२०२३ मधील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून निधी वितरण करण्यात येत आहे.

०९. सदर कार्यक्रमाचा निधी SNA SPARSH प्रणालीद्वारे RBI च्या E-Kuber मार्फत वितरीत करावयाचा असल्याने सदरचे अनुदान बिनशर्त आहे.

१०. प्रस्तुत शासननिर्णय वित्त विभाग परिपत्रक दिनांक ०९.०४.२०२६ व दिनांक ०७.०५.२०२६ च्या परिपत्रकातील तरतूदीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२३१३०४२७८७१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL VITHALRAO SAWARE

Digitally signed by ANIL VITHALRAO SAWARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=073348B7A8767F0F7865422DF1E65CE2F3BCDF6786E4712E2C088A9AC4FFEE3F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1C7875BFBCCDB94828A5028954F06ED28EC75FD43053DB3AE8254FA5A5D14A57, cn=ANIL VITHALRAO SAWARE
Date: 2026.07.23 17:10:48 +05'30'

(अनिल वि. सावरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.

२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई.
५. संचालक (प्राथमिक), आरोग्य सेवा, पुणे.
६. संचालक, (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
७. अति. संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
८. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११.वित्त विभाग (अर्थसंकल्प/व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
१२.अवर सचिव, (अर्थसंकल्प व लेखा), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.निवडनस्ती (एनएचएम)....